पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा

● वर्ष १ ● अंक ११६ ● शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MAHMAR/ 26 /A3072 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com


## »थोडक्यात

### 'गोंधळ'ला ऑस्करचे नामांकन!

**मुंबई :** अकरा वर्षांपूर्वी 'कोर्ट' चित्रपटाने मिळवलेला मान आता पुन्हा एकदा मराठी चित्रपटसृष्टीच्या पदरात पडला आहे. महाराष्ट्राच्या जिवंत लोकपरंपरेचे दर्शन घडवणाऱ्या 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची ९९ व्या अकादमी पुरस्कारांसाठी (ऑस्कर) भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड झाली आहे. या ऐतिहासिक यशानंतर चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माता संतोष डावखर यांनी अत्यंत भावूक होत 'लहानपणापासून ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंकडे आम्ही अभिमानाने पाहात आलो आहोत. आज 'गोंधळ'च्या माध्यमातून जागतिक व्यासपीठावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे, हा क्षण आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा, भावनिक आणि ऐतिहासिक आहे.

---

### पांढऱ्या सोन्याला मिळणार झळाळी!

**जळगाव :** जिल्ह्यात कापूस खरेदी हंगामाला सुरुवात झाली असून, जिनिंग व बाजार समित्यांमध्ये कापसाची आवक हळूहळू वाढत आहे. यंदा आंतरराष्ट्रीय स्तरावर कापसाचे उत्पादन सुमारे ११ कोटी ७३ लाख गाठी, तर सूतगिरण्यांची मागणी १२ कोटी २९ लाख गाठी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे जागतिक बाजारात सुमारे ५० लाख गाठींची तूट निर्माण होण्याची शक्यता असून, जुन्या कापूस साठ्याचीही कमतरता आहे. यामुळे कापसाला आंतरराष्ट्रीय बाजारातून चांगली मागणी मिळण्याची शक्यता आहे.

---

### विसर्जनादरम्यान दोन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू!

**सटाणा :** तालुक्यातील नामपुर येथील एका खासगी शिकवणीमध्ये बसवण्यात आलेल्या गणपती विसर्जन करण्यासाठी गेलेल्या २ विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ब्रिटिशकालीन बंधाऱ्यात पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचे समोर आलं आहे. नामपूर येथील ऋतिक दादाजी वाघ (१७ ) व उत्राणे येथील अथर्व दिपक पगार (१७) असे या मुलांचे नावे आहेत. या घटनेने आनंदात सुरू असलेल्या गणेशोत्सवावर दुःखाचे विरजण पडले असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

# सर्वात लांब फ्लायओव्हर नागपुरात!

## आज लोकार्पण, नितीन गडकरींसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची उपस्थिती

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**नागपूर :** गणेशोत्सवाच्या काळात सरकारकडून नागपूरकरांना एक अत्यंत महत्त्वाचे गिफ्ट मिळत आहे, आणि ते म्हणजे राज्यातील सर्वात लांब उड्डाणपूल उत्तर आणि दक्षिण नागपूरला जोडणारे तब्बल ८.९ किलोमीटर लांबीचे उड्डाणपुलाचे लोकार्पण १९ सप्टेंबर रोजी होत आहे.

उत्तर नागपुरातील इंदोरापासून सुरू होणारे हे उड्डाणपूल दक्षिण नागपुरातील दिघोरी परिसरापर्यंत जाणार आहे. त्यामुळे या उड्डाणपुलाच्या माध्यमातून नागपूरकरांना थेट उत्तर नागपुरातून दक्षिण नागपूरपर्यंत कुठल्याही वाहतूक कोंडी शिवाय आणि अडथळ्यांशिवाय तीव्र गतीने जाणे शक्य होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शनिवारी संध्याकाळी या सुमारे ९९८ कोटी रुपये खर्चून तयार झालेल्या उड्डाणपुलाचे उद्घाटन पार पडेल.

विशेष म्हणजे हे उड्डाणपूल महाल परिसरातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या घराच्या अगदी जवळून जातो. त्यामुळे या उड्डाणपुलाला डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी होती. शासनाकडून ही मागणी मान्य होऊन या उड्डाणपुलाला 'डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार उड्डाणपूल' असे नाव दिले जाणार असल्याची माहिती आहे.




### एप्रिलमध्येच होणार होता वाहतुकीसाठी खुला!

नागपूर शहराच्या पूर्व भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा उड्डाणपूल महत्वाचा ठरणार आहे. एप्रिल २०२६ पर्यंत हा उड्डाणपूल पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्याचे उद्दिष्ट होते,मात्र विलंबामुळे लोकार्पणासाठी सप्टेंबर उजाडला आहे. उड्डाणपुलाचे बांधकाम जुन्या आणि दाट लोकवस्तीच्या भागातून करण्यात आल्याने आव्हानात्मक कार्य होते.

### ९९८ कोटींचा खर्च अन् तब्बल ८.९ किमी लांबी!

नागपूरच्या शिरपेचात आज आणखी एक मानाचा तुरा रोवला जात आहे. तब्बल ९९८ कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या आणि लांब उड्डाणपूल असून ८.९ किलोमीटरचा प्रवास आता अवघ्या काही मिनिटांत पार करता येणार आहे. 'अल्ट्रा हाय परफॉर्मन्स फायबर रिइन्फोर्सड कॉंक्रीट' या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधलेल्या या पुलावर अशोक चौकात विशेष 'फाइव्ह वे' (५ रस्ते जोडणारा) चौक तयार करण्यात आला आहे. शहरातील ३ प्रमुख आणि ११ लहान चौकांतील वाहतूक कोंडी या एकाच पुलामुळे पूर्णपणे सुटणार आहे.




# यवतमाळच्या विद्यार्थ्याची मुंबई आयआयटीत आत्महत्या!

## कारवाईच्या भीतीने उचलले टोकाचे पाऊल

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**यवतमाळ :** येथील विद्यार्थी मुंबई आयआयटीमध्ये द्वितीय वर्षाला शिकत होता. आई-वडील दोघेही उच्चशिक्षित व नोकरदार आहेत. मात्र अचानक मुलाने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची घटना घडली. परीक्षेदरम्यान मोबाइलचा वापर केल्याने त्याने कारवाईच्या भीतीने हा टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

ही घटना शुक्रवारी घडली असून, मृतक विद्यार्थ्याचे नाव साहिल वाकोडे असे आहे. या घटनेमुळे वाकोडे कुटुंबीयावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.मुंबईच्या पवई आयआयटीमध्ये साहिल वाकोडे एनर्जी सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षात शिकत होता. शुक्रवारी परीक्षेदरम्यान हा विद्यार्थी मोबाइल फोन वापरताना पकडला गेला. त्याने उत्तर शोधण्यासाठी परीक्षेची प्रश्नपत्रिका चॅटजीपीटी या एआयचा अँपवर अपलोड केल्याचे समोर आले होते. शिक्षक व विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्याशी चर्चा करून त्याचे सस्पेंशन केले होते. या घटनेचा त्याच्या शैक्षणिक कारकिर्दीवर विपरीत परिणाम होणार नाही, असे आश्वासनही प्रशासनाने दिले होते. त्यानंतर शुक्रवार, १८ सप्टेंबर



रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास वसतिगृहातील खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. साहिल वाकोडे याचे कुटुंबीय मुंबईत पोहोचले असून साहिलचा मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवण्यात आल्याची माहिती आहे.

### विद्यार्थी आंदोलनात मृतकाची आईही सहभागी

घटनेनंतर विद्यार्थ्यांनी प्रवेशद्वारावर एकत्र येत प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन सुरू केले आहे. आयआयटी प्रशासनाने घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. संस्थेचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र विद्यार्थी मागण्यावर ठाम होते. आगामी परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांनी संस्थेचे डीन आणि संचालक यांचा राजीनाम्याची मागणी केली आहे. साहिलची आई सध्या आयआयटी मुंबई कॅम्पसमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शेजारी बसली आहे.

### तिरूपतीच्या प्रसादात भेसळयुक्त तुपाचा वापर!

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**तिरुपती:** प्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिराच्या प्रसादातील (लाडू) तूप भेसळ प्रकरणात ईडीने मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणी ईडीने तूप पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या मालकाला अटक केली आहे. तिरुपती लाडू बनवण्यासाठी अत्यंत निकृष्ट दर्जाच्या आणि भेसळयुक्त तुपाचा वापर झाल्याचा गंभीर आरोप या कंपनीवर आहे. या अटकेमुळे आता या प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार आणि मोठ्या साखळीचा पर्दाफाश होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण देशात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

ईडीने तूप बनवणाऱ्या कंपनीचे मालक कैलाश चंद मंगला यांना मनी लॉंड्रिंगच्या आरोपाखाली अटक केली आहे. शुक्रवारी झालेल्या या कारवाईनंतर ईडीने सांगितले की, तिरुपती लाडू प्रसाद बनवण्यासाठी वापरण्यात येणारे तूप रिफाइंड पाम तेल, पामोलिन आणि विविध रसायनांपासून बनवले जात होते.

# राष्ट्रवादीचे महानगर अध्यक्ष विजयभाऊ देशमुख यांच्या निवासस्थानी महालक्ष्मी व्रत



प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला:** राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांच्या जवाहरनगर मधील निवासस्थानी महालक्ष्मी व्रत भक्तिभावाने साजरे होत आहे. गुरूवारी सप्तमीला ज्येष्ठा कनिष्ठा गौरी विराजमान झाल्या. आरती नंतरअष्टमीला महाप्रसाद वितरण झाले. धूप दीप आरत्या तसेच राळीचा घमघमाट यामुळे प्रसन्नता वाढली आहे.

देशमुख कुटुंबीय अतिशय भक्ती भावाने आणि श्रद्धेने महालक्ष्मी व्रत साजरे करतात.

यावेळी महालक्ष्मी समोर फुलांची सुंदर सजावट केली आहे. तसेच आकर्षक रोषणाई, रांगोळ्या काढल्या आहेत. महालक्ष्मी समोर फुलोरा, फळफळावळ, मिष्टान्न ठेवण्यात आले. महालक्ष्मीची कृपा तसेच सुख समृद्धी राहावी अशी प्रार्थना करण्यात आली. आ तीन दिवसांच्या व्रताची आज सांगता होणार आहे. विजय भाऊ देशमुख, प्रदीप देशमुख, संजय देशमुख, पंकज देशमुख, आदित्य देशमुख, चिन्मय देशमुख, स्मीत देशमुख, क्रिश देशमुख, रवि भाऊ, मातोश्री इंदुमती देशमुख, प्रभावती देशमुख, कल्पना देशमुख, मंजु देशमुख, स्वप्नाली देशमुख, छाया देशमुख, ईशा, ऋतुजा, मोनु, सोनु, समर, आर्यमन, द्रुवान, तारा यांची उपस्थिती होती. अतिशय हर्षोल्हासात व्रत साजरे करण्यात आले.









### दुष्काळाच्या बैठकीत नेत्यांचा काजू-बदामांवर ताव!

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**नांदेड :** मराठवाड्यासह राज्यात पावसाची मोठी तूट आहे. यंदा कमी पाऊस पडल्याने दुष्काळाची परिस्थिती ओढावली आहे. मराठवाड्यातील शेतकरी चिंतेत सापडला असून पिके करपून जात आहेत. अशा भीषण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी नांदेडच्या जिल्हा नियोजन सभागृहात शनिवारी आढावा बैठक पार पडली. पण दुष्काळग्रस्त भागातील समस्यांवर गांभीर्याने चर्चा करण्यासाठी बैठकीला असणारे नेते आणि अधिकारी काजू-बदामाचा आस्वाद घेत असल्याचे समोर आले. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी जोरदार टीका केली असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.सोयाबीनच्या शेंगा भरलेल्या नाहीत, तर कापसाची वाढ खुंटल्याने वर्षभराची मेहनत वाया जाण्याच्या भीतीने शेतकरी डोळ्यात अश्रू आणून संकटाचा सामना करत आहे. दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या नावाखाली घेतलेल्या बैठकीत एसी सभागृहात टेबलावर काजू-बदामाच्या प्लेटा पाहायला मिळत आहे.

# शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न पेटला!
## खाजगी शिक्षक संघटनेचे ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी १९ सप्टेंबर



**अकोला :** दरमहा उशिरा होणाऱ्या वेतनामुळे त्रस्त झालेल्या खाजगी शाळांमधील शिक्षकांनी अखेर आक्रमक भूमिका घेतली. महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेच्या वतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री. रतनसिंग पवार यांच्या दालनाबाहेर संघटनेचे पदाधिकारी व शिक्षकांनी ठिय्या देत वेळेवर वेतन देण्याची जोरदार मागणी केली.

खाजगी शाळांमधील शिक्षकांचे वेतन दरमहा वेळेत होणे अपेक्षित असताना अनेकदा वेतनास विलंब होत असल्याने शिक्षकांमध्ये नाराजी आहे. खाजगी शाळांमधील शिक्षकांचे वेतन नियमितपणे आणि वेळेत होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात दरमहा वेतन लांबणीवर पडत असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते, दैनंदिन आर्थिक नियोजन अशा अनेक बाबींवर वेतनाच्या विलंबाचा परिणाम होत असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. वेतन वितरणाची प्रक्रिया सुरळीत करून प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला शिक्षकांच्या खात्यात वेतन जमा करावे, अशी ठाम मागणी यावेळी महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली.

आंदोलनाची दखल घेत प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांनी वेतन पथक अधीक्षक यांना तातडीने बोलावून घेतले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह उपस्थित शिक्षकांशी यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली.

चर्चेदरम्यान यापुढे वेतन प्रक्रिया वेळेत पूर्ण करून दरमहा १ तारखेलाच शिक्षकांचे वेतन होण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे आश्वासन प्राथमिक शिक्षणाधिकारी पवार यांनी दिले. त्यामुळे शिक्षकांच्या प्रमुख मागणीबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले.

या आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनिष गावंडे, राज्य अध्यक्ष गजानन सवडतकर, उपाध्यक्ष अलकेश खेंडकर, सहसचिव अविनाश मते, महिला आघाडी अध्यक्षा सुवर्णा वरोकार, अमरावती विभाग अध्यक्ष अमित सिरसाट, जिल्हाध्यक्ष वसिम मुजाहीद आणि महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रजणी अरबाळ यांनी केले.यावेळी बहुसंख्य शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाने दिलेल्या सकारात्मक आश्वासनानंतर आंदोलनाची सांगता करण्यात आली. मात्र, आगामी काळात वेतन वेळेत न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला

# घर बांधताना विद्युत तारांचा अडथळा; निवेदन देऊनही टाळाटाळ

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**हातरूण :** येथे घराचे बांधकाम करताना विद्युत तारांमुळे अडथळा निर्माण होत असल्याने घरमालकास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्युत तारांमुळे बांधकामाच्या कामात अडथळा येत असून, भविष्यात अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने संबंधित विद्युत विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या समस्येबाबत शेख आरीफ शेखा एकबाल यांनी संबंधित विभागाकडे लेखी निवेदन देऊन विद्युत तारांचा योग्य तो बंदोबस्त करण्याची मागणी केली. मात्र, निवेदन देऊनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप शेख आरिफ यांच्या कडून करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाकडून केवळ टाळाटाळ केली जात असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

घराचे बांधकाम सुरू असताना विद्युत तारांची सुरक्षितता हा गंभीर विषय असून, कामगार तसेच परिसरातील



नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून विद्युत तारांबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

### मोझर स्मशानभूमी रस्त्याच्या कामात गैरप्रकाराचा आरोप

**मूर्तिजापूर :** मोझर स्मशानभूमी रस्त्याच्या कामासाठी मंजूर निधीत गैरप्रकार झाल्याचा आरोप करीत संजय तुळशिराम काकड यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. जनसुविधा व १५वा वित्त आयोगांतर्गत मंजूर कामे अंदाजपत्रकानुसार न करता खोटी एम.बी. व सी.सी. तयार करून देयके काढण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणाची कागदपत्रांसह प्रत्यक्ष रस्त्याचे खोदकाम करून सखोल चौकशी करावी, तसेच दोषी अधिकारी, कर्मचारी व संबंधित ठेकेदारावर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी काकड यांनी केली आहे. तक्रारीच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता व संबंधित उपअभियंत्यांना देण्यात आल्या आहेत.

# मूर्तिजापूर तालुकास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी १९ सप्टेंबर



**मुर्तीजापुर :** व्यंकटेश बालाजी स्कूल मुर्तीजापुर येथे, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, तालुका क्रीडा संकुल समिती व तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, मूर्तिजापूर जिल्हा अकोला द्वारा आयोजित, बुद्धिबळ तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.

उद्घाटक म्हणून अवधूत ढेरे, प्रमुख अतिथी . अविनाश बेलाडकर, राजेश गावंडे होते. तालुकास्तरीय विजयी खेळाडू पुढीलप्रमाणे आहेत. 14 वर्ष आतील मुले 1)आर्यन चव्हाण स्वर्गीय परमानंद मालानी इंग्लिश कॉन्व्हेंट, 2)चैतन्य राऊत स्वर्गीय गुलाबराव बांबल विद्यालय किनखेड, 3)अर्पित जोशी व्यंकटेश बालाजी स्कूल, 4)कविष धांडे व्यंकटेश बालाजी स्कूल, 5)आयुष राजपाल लिटिल फ्लावर स्कूल.

14 वर्षे आतील वयोगट मुली 1)सर्वेक्षा काकोडे व्यंकटेश बालाजी स्कूल, 2)संस्कृती शेंडे शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट,3) ख़ुशी ठाकरे शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट, 4)पूर्वी भटकर व्यंकटेश बालाजी स्कूल, 5)वेदांती बोळे व्यंकटेश बालाजी स्कूल.

17 वर्ष आतील विजय मुले 1) ओम यादव व्यंकटेश बालाजी स्कूल 2)भार्गव तराळे व्यंकटेश बालाजी स्कूल 3)आयुष इंगळे शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट, 4)सक्षम गोरले गाडगे महाराज विद्यालय 5)आयुष सरदार शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट.

17 वर्ष आतील विजयी मुली 1)वेदा दुबे स्वर्गीय परमानंद मालानी स्कूल, 2)जागृती जाधव शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट 3) मानवी तायडे शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट, 4)मंजरी तिडके व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूल, 5)जागृती शेगोकार शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट.

19 वर्ष आतील विजयी मुले 1)हर्षल राऊत 2)सम्यक सरदार 3)अनिकेत पडगव्हाण 4)गजानन मुसळे 5)मंथन चव्हाण सर्व शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट. 19 वर्षे आतील विजय मुली 1) समीक्षा जाधव 2)वेदिका उगले 3) साक्षी माने, 4)श्रुती गोपनारायण 5)खुशी गावंडे सर्व शांतिनिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट. वरील सर्व विजयी खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता निवड झालेली असून तालुका क्रीडा अधिकारी सतीश चंद्र भट यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तालुकास्तरीय स्पर्धेत पंच म्हणून महेश चव्हाण , अक्षय भागवत , प्रशांत चहाकर अतुल घाटे, निलेश उंबरकर , वैभव मालठाणे यांनी धुरा सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती माटोडे आभार प्रदर्शन विनोद काळबांडे यांनी केले.

# गणपती Special...
# अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध
## मूलांक 4 — हळू चालतो... पण थांबत नाही! काही लोकांच्या आयुष्यात यश पटकन येत नाही...

अडथळे येतात, विलंब होतो, कधी गैरसमज होतात... आणि मनात प्रश्न येतो - "माझ्यासाठी सगळं एवढं कठीण का?" पण मूलांक ४ ची खरी कहाणी इथेच सुरू होते. हळू चालतो... पण थांबत नाही!

कारण त्याला फक्त यश नको असतं - मजबूत पाया हवा असतो. ज्यांचा जन्म ४, १३, २२ किंवा ३१ तारखेला झाला आहे, त्यांचा मूलांक ४ मानला जातो. अंकशास्त्रात मूलांक ४ चा संबंध राहूशी जोडला जातो. राहू म्हणजे मस्तक— म्हणून विचार, रणनीती, वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची क्षमता आणि सतत काहीतरी plan करण्याची वृत्ती यांच्याशी या अंकाचा संबंध मानला जातो.

डोक्यात सतत Planning... आणि बाहेरून शांत!

मूलांक ४ व्यक्ती प्रत्येक गोष्ट लगेच बोलून दाखवेलच असं नाही. ती आधी निरीक्षण करते... विचार करते... analysis करते... आणि मग निर्णय घेते. आणि त्यांचं Planning? जबरदस्त!

समोरच्याला वाटतं- "हा काहीच करत नाही..." पण मनात मात्र पुढच्या दहा पावलांचा विचार सुरू असतो! त्यांना shortcut पेक्षा system आवडतो. दिखावा कमी... कामाची पद्धत आणि परिणाम महत्त्वाचा.

संघर्ष जास्त... पण त्यातूनच ताकद!

मूलांक ४ च्या आयुष्यात काही गोष्टी उशिरा मिळण्याची शक्यता मानली जाते. इतर लोक पुढे गेलेले दिसतात... आणि आपण अजूनही प्रयत्न करत असतो. कधी निराशा येते. कधी स्वतःवरच प्रश्नचिन्ह उभं राहतं.

पण हीच व्यक्ती पुन्हा स्वतःला सावरते आणि म्हणते- "थोडा वेळ लागेल... पण मी करून दाखवेन!" "देर से मिलती है मंज़िल, मगर जब मिलती है... तो सफ़र की कीमत समझ आती है।" मूलांक ४ ची गोष्ट म्हणजे संघर्षातून स्वतःला घडवण्याची गोष्ट.

प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांकडे पाहूया...Barack Obama — ४ ऑगस्ट मूलांक ४. त्यांच्या सार्वजनिक प्रवासात नियोजन, संघटन, संवाद आणि विचारपूर्वक नेतृत्वाचा संदर्भ घेता येतो.

किशोर कुमार — ४ ऑगस्ट गायन, अभिनय, संगीत, दिग्दर्शन अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. एकाच चौकटीत न राहता स्वतःची वाट शोधण्याची वृत्ती त्यांच्या प्रवासातून पाहता येते.

सरदार वल्लभभाई पटेल — ३१ ऑक्टोबर- ३१ म्हणजे मूलांक ४. दृढनिश्चय, संघटन आणि कठीण परिस्थितीत ठाम राहण्याची क्षमता त्यांच्या जीवनाशी जोडली जाते. श्रीदेवी — १३ ऑगस्ट - १३ म्हणजे मूलांक ४. बालकलाकारापासून मोठ्या अभिनेत्रीपर्यंतचा त्यांचा प्रवास सातत्य आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याची जिद्द दाखवतो.

देवेंद्र फडणवीस — २२ जुलै- २२ म्हणजे मूलांक ४. त्यांच्या सार्वजनिक प्रवासात दीर्घकालीन काम, संघटन आणि प्रशासकीय भूमिकांचा संदर्भ घेता येतो. - अजितदादा पवार — २२ जुलै- २२ म्हणजे मूलांक ४. त्यांच्या दीर्घ सार्वजनिक प्रवासात व्यवस्थापन, संघटन आणि निर्णयक्षमतेचा संदर्भ घेता येतो. Lifestyle — स्वतःच्या पद्धतीची!- मूलांक ४ ची Lifestyle अनेकदा practical आणि planned असते. Planning जबरदस्त! प्रत्येक गोष्ट आधी विचार करून करण्याची सवय. त्यांना दिखाव्यापेक्षा quality आणि उपयोगिता महत्त्वाची वाटू शकते.

घर असो, काम असो किंवा व्यवसाय - व्यवस्था, system आणि future security याकडे त्यांचं लक्ष असतं. Routine आवडतो... पण स्वतःच्या नियमांनुसार! पैसा उधळण्यापेक्षा future planning, saving आणि स्थैर्य यांना महत्त्व देण्याची प्रवृत्ती असू शकते.

बाहेरून शांत दिसणारी व्यक्ती आतून मात्र सतत विचार करत असते- "पुढे काय? आता काय करायचं? हे अजून चांगलं कसं करता येईल?" दिखावा कमी... Planning जास्त! वेग कमी... पण दिशा पक्की! Career आणि Money

मूलांक ४ ला फक्त नोकरी करायची नसते -कामाची एक पद्धत निर्माण करायची असते. Management, administration, business, technology, engineering, planning, research, operations यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांची practical विचारसरणी उपयोगी ठरू शकते.

Money बाबतीत - जलद कमाईपेक्षा स्थिरता निर्माण करण्याकडे कल असू शकतो. पण अचानक risk घेणे किंवा हट्टाने निर्णय घेणे टाळणे महत्त्वाचे. Relationships — भावना खोल, व्यक्त होणं कमी मूलांक ४ व्यक्ती प्रेम




मोठमोठ्या शब्दांत व्यक्त करेलच असं नाही. ती प्रेम बोलून कमी... करून जास्त दाखवते.

संकटात उभी राहील. जबाबदारी घेईल. काळजी घेईल. पण स्वतःच्या भावना मनात ठेवण्याची शक्यता असते. म्हणून-

"कुछ लोग अपनी तकलीफ़ बता नहीं पाते,
बस मुस्कुराते हैं... और निभाते जाते हैं।"
शांत आहे म्हणजे भावना नाहीत असं नाही...
कदाचित भावना खूप खोल आहेत.

मूलांक ४ ची खरी कहाणी... त्यांना आयुष्याने shortcut दिला नाही... म्हणून त्यांनी स्वतःचा रस्ता तयार केला. उशीर झाला तरी चालेल. अडथळे आले तरी चालेल. पण पाया मजबूत हवा. "रास्ते चाहे मुश्किल हों, कदम रुकने नहीं चाहिए... मंज़िल देर से मिले तो मिले, मगर नींव कमजोर नहीं होनी चाहिए।" हळू चालणं म्हणजे मागे राहणं नाही. कधी कधी हळू चालणारा माणूसच सर्वात दूर जातो.

गणपती बाप्पांचा संदेश- Planning करा. संयम ठेवा. विचारपूर्वक निर्णय घ्या. आणि स्वतःच्या प्रवासाची तुलना दुसऱ्याशी करू नका. तुमचा वेग कमी असू शकतो... पण तुमचा पाया मजबूत असेल तर तुमची इमारत उंच जाऊ शकते. एक महत्त्वाची गोष्ट- फक्त मूलांक ४ पाहून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवता येत नाही. तुमच्या पूर्ण जन्मतारखेत ४ किती वेळा आला आहे, इतर कोणते अंक आहेत आणि त्यांची रचना कशी आहे, यावरही अंकशास्त्रीय interpretation बदलू शकते. अंक फक्त संख्या नाहीत... प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते.

तुमचा मूलांक ४ आहे का? पाहा.



सीमा बक्षी
अकोला
मो. नं.
9834571153

# अधिराज स्वीमिंग पूलमध्ये अल्पवयीनाचा मृत्यू; निष्काळजीपणाचा बळी की दुर्दैवी अपघात?

वि. प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोट :** शहरातील जुन्या बोर्डी रस्त्यावरील अधिराज स्वीमिंग पूलमध्ये १७ वर्षीय अल्पवयीन मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (ता. १८) दुपारच्या सुमारास घडली. या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून, खासगी स्वीमिंग पूलमधील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अल्पवयीन मुलाचा जीव गेल्यानंतर पूल व्यवस्थापनाच्या जबाबदारीबाबत नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार वेस परिसरातील स्पंदन अमोल खाजवणे (वय १७) हा आपल्या मित्रांसह अधिराज स्वीमिंग पूलमध्ये पोहण्यासाठी गेला होता. पोहत असताना तो पाण्यात बुडाला. बराच वेळ तो मित्रांना दिसून न आल्याने शोधाशोध करण्यात आली. त्यानंतर त्याला पाण्यातून बाहेर काढून तातडीने ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच अकोट शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पीएसआय गोपालघरे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मृतदेहाचे शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले असून, पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद (मर्ग) केली आहे. पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. दुपारी चारनंतर आठ ते दहा मित्र स्वीमिंगसाठी आले होते. त्यांची प्रवेश नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात आली होती का? सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये किती जण प्रवेश करताना आणि बाहेर पडताना दिसतात?. काही नागरिकांनी तर संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# अंतराळात मॅरेथॉन धावण्याचा विक्रम करणारी पहिली अंतराळवीर सुनीता विल्यम्स!

सुनीता लिन 'सुनी' विल्यम्स (मूळ आडनाव: पंड्या) यांचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ रोजी झाला. ती एक अमेरिकन अंतराळयात्री आणि निवृत्त अमेरिकन नौदल अधिकारी आहे. तिने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अनेक मोहिमांमध्ये भाग घेतला आहे. ती एक्सपेडिशन १४ मध्ये सहभागी झाली, एक्सपेडिशन १५ आणि एक्सपेडिशन ३२ मध्ये फ्लाइट इंजिनिअर होती, तर एक्सपेडिशन ३३ ची कमांडर होती. २०२४ मध्ये बोईंग क्रू फ्लाइट टेस्टमध्ये ती पहिली महिला होती जी कक्षीय अंतराळयानाच्या चाचणी उड्डाणात सहभागी झाली. तिने अंतराळात एकूण ६०८ दिवस आणि २० मिनिटांचे वास्तव्य केले आहे. तसेच, तिने ९ अंतराळ चाल (स्पेसवॉक) केल्या, ज्याचा एकूण वेळ ६२ तास आणि ६ मिनिटे आहे. हा वेळ महिलांमध्ये सर्वाधिक आणि एकूण चौथा क्रमांक आहे.

सुनीता विल्यम्स यांचा जन्म अमेरिकेतील ओहायो राज्यातील युक्लिड येथे १९ सप्टेंबर १९६५ रोजी झाला, परंतु ती नीडहम, मॅसॅच्युसेट्स ला आपले गाव मानते. तिचे वडील दीपक पंड्या हे भारतीय-अमेरिकन न्यूरोॲनाटॉमिस्ट होते आणि ते गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातून आले होते. तिची आई उर्सुलिन बॉनी पंड्या ही स्लोव्हेन-अमेरिकन होती. सुनीताला दोन मोठे भाऊ-बहिणी आहेत; जय थॉमस आणि दीना अन्नाद.

सुनीताने आपल्या भारतीय आणि स्लोव्हेन वारशाचा सन्मान म्हणून अंतराळात स्लोव्हेनियाचा झेंडा, समोसा आणि कार्निओलन सॉसेज नेले. तिला अमेरिकेत 'सुनी' आणि स्लोव्हेनियात 'सोनच्का' म्हणून संबोधले जाते. सुनीताने १९८३ मध्ये नीडहम हायस्कूल मधून शिक्षण पूर्ण केले. तिने १९८७ मध्ये युनायटेड स्टेट्स नेव्हल अकादमी मधून भौतिकशास्त्रात बी.एस. पदवी मिळवली आणि १९९५ मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून अभियांत्रिकी व्यवस्थापनात एम.एस. पदवी प्राप्त केली. सुनीता मे १९८७ मध्ये अमेरिकेच्या आरमारात एनसाइन म्हणून रुजू झाल्या. त्या नौदल वैमानिक बनल्या आणि त्यांनी ३,००० पेक्षा जास्त तास उड्डाण केले. त्या १९९८ मध्ये नासात निवडल्या गेल्या आणि २०१७ मध्ये नौदलातून निवृत्त झाल्या.

सुनीता यांनी १९९८ मध्ये नासामध्ये प्रशिक्षण सुरू केले. सुनीता २००६ मध्ये एसटीएस-११६ मोहिमेसह अंतराळात गेल्या आणि एक्सपेडिशन १४ मध्ये सामील झाल्या. त्यांनी चार अंतराळ चाल केल्या आणि २९ तास १७ मिनिटांचा वेळ घालवला, जो त्यावेळी महिलांमध्ये सर्वाधिक होता. २००७ मध्ये त्या एसटीएस-११७ मोहिमेसह पृथ्वीवर परतल्या. १६ एप्रिल २००७ रोजी सुनीताने अंतराळातून पहिली मॅरेथॉन धावली. तिने बोस्टन मॅरेथॉन मध्ये भाग घेतला आणि ४ तास २४ मिनिटांत ती पूर्ण केली. सुनीता २०१२ मध्ये सोयुझ टीएमए-०५एम मोहिमेसह अंतराळात गेल्या आणि एक्सपेडिशन ३२/एक्सपेडिशन ३३ मध्ये सहभागी झाल्या. त्या एक्सपेडिशन ३३ च्या कमांडर झाल्या, ही कामगिरी करणारी ती दुसरी महिला होती. त्यांनी अंतराळात ट्रायथलॉनही पूर्ण केली. २०२४ मध्ये सुनीता बोईंग क्रू फ्लाइट टेस्ट मध्ये सहभागी झाल्या, पण तांत्रिक समस्यांमुळे त्या आणि बॅरी विल्मोर ९ महिन्यांहून जास्त काळ आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहिल्या. त्या स्पेसएक्स क्रू-९ मोहिमेसह १८ मार्च २०२५ रोजी पृथ्वीवर परतल्या.

सुनीता यांचे पती मायकेल जे. विल्यम्स हे टेक्सासमधील फेडरल मार्शल आहेत. त्या हिंदू धर्म पाळतात आणि त्यांनी अंतराळात भगवद्गीता आणि उपनिषदे नेली होती. त्या भारत आणि स्लोव्हेनिया येथे अनेकदा भेट देतात. सुनीता यांना पद्म भूषण, भारत सरकार, मेडल 'फॉर मेरिट इन स्पेस एक्सप्लोरेशन', रशिया सरकार, गोल्डन ऑर्डर फॉर मेरिट्स, स्लोव्हेनिया सरकार, बीबीसी १०० वुमन हे पुरस्कार मिळाले आहेत.

नासाची अनुभवी आणि लोकप्रिय अंतराळवीर सुनीता विलियम्सने २७ वर्षांची प्रदीर्घ आणि ऐतिहासिक सेवा बजावल्यानंतर निवृत्ती जाहीर केली आहे. तिची निवृत्ती ही २७ डिसेंबर २०२५ रोजीपासून प्रभावी झाली. तिने तिच्या करिअरमध्ये आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष स्टेशन (घएए)वर तीन मोहिमा पूर्ण केल्या. तर मानवी अंतराळ उड्डाणात अनेक विक्रम नावावर कोरले. तिची निवृत्ती ही अंतराळ उड्डाणाच्या एका युगाचा शेवट मानल्या जातो. मूळ भारतीय वंशाची सुनिता विलियम्सविषयी देशातही अनेकांच्या मनात हळवा कोपरा आहे. तिने निवृत्तीनंतर भारतात येऊन अंतराळ विज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्याची अनेकांची इच्छा आहे.

### आज जन्मदिवस




### ६०८ दिवस अंतराळात मुक्काम

नासानुसार, सुनीता विलियम्सने एकूण ६०८ दिवस अंतराळात मुक्काम ठोकला. इतर कोणत्याही अंतराळवीरापेक्षा ती सर्वाधिक वेळा अंतराळ स्थानकात होती. तिने अंतराळात ९ स्पेसवॉक केले. त्याचा कालावधी ६२ तास ६ मिनिटे इतका होता. एखाद्या महिला अंतराळवीराकडून अवकाशात, अंतराळात करण्यात आलेला हा सर्वाधिक चालण्याचा विक्रम आहे. तर चालण्याच्या एकूण नोंदीत ती चौथ्या क्रमांकावर आहे. इतकेच नाही तर अंतराळात मॅरेथॉन धावण्याचा विक्रम करणारी ती पहिली अंतराळवीर ठरली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# महामंडळाच्या एनसीएमसी योजनेत महत्त्वाचे बदल

## आता आधार कार्डशी लिंक असणाऱ्या मोबाईलवर येणाऱ्या ओटीपी वरून होईल नोंदणी

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला :** एनसीएमसी कार्ड बद्दल प्रवाशांच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी आणि सवलतींचा प्रवास अधिक पारदर्शक व सुलभ करण्यासाठी एनसीएमसी कार्ड योजनेत महत्त्वाचे बदल केले आहेत.




अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेतील अनेक लाभार्थ्यांचे वाढत्या वयामुळे किंवा इतर कारणांमुळे बायोमेट्रिक (बोटांचे ठसे) जुळण्यात अडचणी येत होत्या. यावर तोडगा म्हणून महामंडळाने 21 सप्टेंबर 2026 पासून आधार कार्डशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर येणाऱ्या OTP द्वारे नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

यामुळे ज्या प्रवाशांचे बोटांचे ठसे जुळत नाहीत, त्यांना आता विनाअडचण नोंदणी करता येईल. प्रवासादरम्यान एनसीएमसी कार्ड गहाळ किंवा चोरीला गेल्यास प्रवाशांचे नुकसान होऊ नये म्हणून २१ सप्टेंबरपासून जुने कार्ड ब्लॉक करून 199 रुपये शुल्क भरून नवीन कार्ड नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. ज्या प्रवाशांनी 19 सप्टेंबरपर्यंत आपली नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांना 25 सप्टेंबरपासून अधिकृतपणे NCMC कार्डचे वितरण सुरू केले जाईल. 16 सप्टेंबरपासून नोंदणी करणाऱ्या सर्व अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना नोंदणीवेळी क्यूआर कोड (QR Code) असलेली पावती दिली जात आहे. ही पावती एसटी वाहकाकडील (Conductor) ETIM मशीनवर स्कॅन करून प्रवाशांना थेट सवलतीचे तिकीट दिले जाईल. ही QR कोड पावती 30 दिवसांपर्यंत ग्राह्य राहील. या 30 दिवसांच्या आत प्रवाशांनी आपले NCMC कार्ड प्राप्त करून ते ॲक्टिव्ह करणे आणि त्यात 'टॉप-अप' (रक्कम जमा) करणे अनिवार्य आहे.

### एसटी महामंडळाचे तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन

» एसटी प्रवासादरम्यान मिळणाऱ्या विविध सवलतींचा लाभडिजिटल पद्धतीने मिळवण्यासाठी सर्व पात्र सवलतधारकांनी (अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांनी) लवकरात लवकर आपली NCMC कार्ड नोंदणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

# बार्शीटाकळी गावात खड्डेच खड्डे



प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**बार्शीटाकळी :** हे तालुक्याचे ठिकाण असून येथे पुरातन मंदिरे आहेत. परंतु गावातील खड्डे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरले आहे. स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष दिसते. तहसील कार्यालय, भूमी अभिलेख, ग्रामीण रुग्णालय, खरेदी विक्री ऑफिस, कोर्ट असून ग्रामीण भागातील लोकांची सतत ये जा राहते. परंतु तालुकास्थान असूनही गाव विकास संदर्भात मागास आहे. येथे नगरपंचायत असून सुद्धा ग्रामपंचायत सारखे काम झाले आहे. बार्शीटाकळी इलेक्शन होऊन जवळपास बारा महिने उलटून गेले आहे पण बाजार लाईन, मेन रोडवर खड्डे तसेच अस्वच्छता दिसते. स्थानिक रहिवासी तसेच शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी यांना त्रास सहन करावा लागतो. बाजार लाईन भागातील खड्ड्यामुळे नागरिकांना चालणे कठीण झाले आहे. रस्ते तसेच नाल्यांची दुरूस्ती प्राथमिकपणे करावी अशी मागणी केली जात आहे.

# उडान पुलावर धडकले टिप्पर व टाटा मॅक्झीमो

## अपघातात टाटा मॅक्झीमो चे मोठे नुकसान

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला :** शहरातील नेहरू पार्क ते लक्झरी पुलाकडे जाणाऱ्या उडान पुलावर आज शनिवारी बारा वाजे दरम्यान विरुद्ध दिशेने येणाऱ्या टिप्पर व टाटा मॅक्झीमो मध्ये जोरदार धडक झाली. या घटनेत टाटा मॅक्झीमो चालक किरकोळ जखमी झाला असून टाटा मॅक्झीमो वाहनाचे मात्र मोठे नुकसान झाले आहे या घटनेमुळे उडान पुलावरील वाहतूक काही वेळापूरती विस्कळीत झाली होती. दोन्ही वाहन चालकांमध्ये चूक कोणाची याबद्दल घेऊन वाद सुरू होता घटनेची माहिती मिळताच शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले होते



वाहतूक कर्मचाऱ्यांनी काही नागरिकांच्या मदतीने दोन्ही अपघातग्रस्त वाहने उडान पुलाच्या रस्त्याच्या कडेला लावीत वाहतूक सुरळीत केली बातमी लिहीस्तोवर याप्रकरणी गुन्हा दाखल झाला की नाही याबद्दल अधिकृत माहिती मिळाली नाही उडानपुला वरून अनेकदा काही वाहने चुकीच्या दिशेने येत असल्याने नेहमीच अपघाताच्या घटना होतात हे पाहता चुकीच्या दिशेने उडान पुलावर वाहने चढविणाऱ्या वाहन चालकांसाठी मार्गदर्शक फलक लावण्यात यावे अशी मागणी होत आहे.

# अकोला येथे 22 रोजी महा गणेशोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला:** सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय, अकोलाच्या वतीने महागणेशोत्सव निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



सांस्कृतिक कार्य तथा माहिती तंत्रज्ञान मंत्री आशीष शेलार यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाला लाभणार आहे. मंगळवार, २२/०९/२०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता राणीमहल, पोलीस लॉन, अकोला येथे कार्यक्रम होणार असून सर्वांसाठी खुला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालय संचालक प्रशांत संगीता कैलास खेडेकर मुंबई, जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांनी केले आहे.

# 8 दिवसांपासून लिफ्ट बंद; रुग्णांची गैरसोय, मुलाला घेऊन जाणारी महिला पडून जखमी

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला:** जिल्हा सर्वोपचार रुग्णालयातील प्रभाग क्रमांक २९, ३०, ३१ आणि ३२ साठी वापरली जाणारी एकमेव लिफ्ट गेल्या सुमारे आठ दिवसांपासून बंद असल्याची माहिती समोर आली आहे.

लिफ्ट बंद असल्यामुळे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना प्रभागांमध्ये ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, आपल्या दिव्यांग मुलाला प्रभाग क्रमांक ३२ मध्ये घेऊन जाणारी एक महिला अचानक पडल्याची घटना समोर आली. या घटनेत महिलेच्या पायाला दुखापत झाल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकारामुळे रुग्णालयातील रुग्णांच्या सुरक्षिततेचा आणि उपलब्ध सुविधांच्या व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. चार प्रभागांसाठी एकच लिफ्ट उपलब्ध असेल, तर ती तब्बल आठ दिवस बंद असताना रुग्णांसाठी पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नाही? लिफ्ट दुरुस्तीसाठी संबंधित प्रशासनाकडून नेमकी कोणती कार्यवाही करण्यात आली? तसेच रुग्णांची गैरसोय आणि सुरक्षितता लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत, असे सवाल आता उपस्थित होत आहेत. रुग्णालय प्रशासनाने लिफ्ट बंद असण्याचे नेमके कारण, दुरुस्तीची सद्यस्थिती आणि पर्यायी व्यवस्थेबाबतची माहिती स्पष्ट करणे गरजेचे आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही लिफ्ट तातडीने सुरू करण्याची मागणी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून होत आहे.

# बेस्ट डिटेक्शनमध्ये अकोला पोलिसांची राज्यस्तरावर निवड

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला :** गुन्ह्यांचा छडा लावण्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अकोला पोलिसांनी पुन्हा एकदा राज्यस्तरावर ठसा उमटविला आहे. अकोला शहरातील श्री सप्तशृंगी अलंकार केंद्रातील सशस्त्र चोरीचा अवघ्या ७२ तासांत छडा लावून आरोपीला जेरबंद करणाऱ्या अकोला पोलिसांच्या तपासाची 'बेस्ट डिटेक्शन'मध्ये राज्यस्तरीय निवड झाली आहे. विशेष म्हणजे, बेस्ट डिटेक्शनमध्ये राज्यस्तरावर दुसऱ्यांदा निवड होणारा अकोला हा राज्यातील एकमेव जिल्हा असल्याचे पोलीस विभागाने म्हटले आहे. ७ मे रोजी आदर्श कॉलनीतील श्री सप्तशृंगी अलंकार केंद्रात पिस्तूल व लोखंडी रॉडचा धाक दाखवत ६९.९० लाखांची सशस्त्र चोरी झाली. पोलिसांनी ३३० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करून आरोपीचा अकोला ते भुसावळपर्यंत माग काढला. रोहनसिंग



सतनामसिंग बावरा याला ११ मे रोजी भुसावळ येथून ताब्यात घेऊन २७.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात २९ जून रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. यापूर्वी अकोट येथील बहुचर्चित कालंका माता मंदिर चोरी प्रकरणाचा यशस्वी तपास केल्याबद्दल अकोला पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची राज्यस्तरीय निवडीसाठी निवड झाली होती. १८ सप्टेंबर रोजी मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात या तपास पथकातील DYSP शंकर शेळके, सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव, हेड कॉन्स्टेबल खुशाल नेमाडे आणि पोलीस कॉन्स्टेबल राज चंदेल* यांचा पोलीस महासंचालक सदानंद दाते

# जि.प. शिक्षण विभागाच्या चौकशीवरच प्रश्नचिन्ह!

## तीन पत्रे, तरीही नस्ती समितीच्या हाती नाही

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**अकोला:** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील कथित प्रशासकीय व वित्तीय गैरव्यवहाराची चौकशी सुरू असतानाच चौकशीसाठी आवश्यक असलेल्या मूळ फाईल्सच समितीला मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

चौकशी समितीच्या अध्यक्षांनी संबंधित विभागाकडे तब्बल तीन वेळा पत्रव्यवहार करूनही मूळ नस्ती व कागदपत्रे उपलब्ध न झाल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कळविल्याचे समोर आले आहे. त्यामुळे चौकशी करायची तरी कोणत्या कागदपत्रांच्या आधारे? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाने शिक्षणाधिकारी अरविंद मोहिरे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. चौकशी समितीने प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांच्याकडे १० एप्रिल २०२६, १८ मे २०२६ आणि २१ मे २०२६ रोजी पत्रव्यवहार केला. चौकशीसाठी आवश्यक असलेल्या मूळ नस्ती आणि संबंधित कागदपत्रे समितीसमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, पत्रांनंतरही आवश्यक कागदपत्रे समितीला मिळाली नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे चौकशी समितीनेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे कागदपत्रे उपलब्ध नसल्याने चौकशी पूर्ण करण्यात अडचण येत असल्याचे कळविल्याचे सांगण्यात येते. मूळ कागदपत्रांशिवाय चौकशीचा निष्कर्ष काढला जाणार असेल, तर त्या चौकशीची विश्वासार्हता किती? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

### चौकशीच्या केंद्रस्थानी असलेली नस्ती कुणाच्या ताब्यात?

» प्राथमिक शिक्षण विभागातील आस्थापना लिपीक अविनाश घोलप यांच्याकडे संबंधित प्रकरणातील महत्त्वाची कागदपत्रे व नस्ती असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, त्यांना चौकशी समितीसमोर हजर करण्यात आले नसल्याचेही सांगण्यात येत आहे.त्यामुळे मूळ नस्ती समितीसमोर का सादर झाली नाही? संबंधित कर्मचारी समितीसमोर का हजर राहिला नाही? आणि तीन पत्रांनंतरही कागदपत्रे उपलब्ध का झाली नाहीत? या प्रश्नांची उत्तरे आता जिल्हा परिषद प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह**

चौकशी समितीने वारंवार पत्रव्यवहार करूनही मूळ कागदपत्रे उपलब्ध होत नसतील, तर संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत तातडीने स्पष्टीकरण मागण्यात आले का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम आणि विद्यमान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डी . एस. लोखंडे यांच्या भूमिकेबाबतही आरोप करण्यात आले आहेत. मात्र, हे आरोप असून त्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे चौकशी समितीला आवश्यक असलेली मूळ कागदपत्रेच उपलब्ध नसणे. कागदपत्रांच्या आधारे वस्तुस्थिती तपासायची असताना तीच कागदपत्रे समितीपासून दूर राहिल्यास चौकशीचा उद्देशच निष्फळ होण्याची शक्यता आहे.

# आधी वंदू तुज मोरया...


मांडेकर परिवार, जुनेशहर


श्री महाभारत गणेश मंडळ, न्यू राधाकिसन प्लॉट


चंद्रकांत चव्हाण, संत कबीर नगर


मंगेश भालेराव, मलकापूर

# अकोला जिल्हा जेष्ठा गौरी दर्शन


वरिष्ठ पत्रकार महेंद्र कवीश्वर, रामदासपेठ


रजनी राजेंद्र पवार राजपूतपुरा


सौ.विद्या देशमुख सहकार नगर


ज्ञानेश्वर बोराखडे, रेखा प्लाट, खामगाव


रमेश अमृतकर, लहान उमरी


रवि जवाहर देशमाने, शिवनगर


गोपाल उंटवाल जयहिंद चौक


पंकजराव देशमुख जवाहर नगर

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# बोरी अडगाव येथील शेतकऱ्यांचे आमरण उपोषण मागे!

## माजी आ. सानंदा यांची मध्यस्थी; कृषीमंत्र्यांशी केली चर्चा

प्रतिनिधी १९ सप्टेंबर




**खामगाव:** बुलढाणा जिल्हयात कोरडा दुष्काळ जाहिर करुन तातडीने नुकसान भरपाई द्यावी,बुलढाणा जिल्हा दुष्काळाच्या यादीत समावेश करा,शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या,पिकविमा योजना शेतकरी हिताची करावी यासह इतर मागण्यांसाठी आमरण उपोषण बोरी अडगाव येथे शेतकरी श्याम किर्तने, गौतम सुरवाडे यांनी सुरुवात केली होती.

१७ सप्टेंबर २०२६ रोजी आमरण उपोषणाची दखल घेवुन राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा,तालुका कृषी अधिकारी सुनिल पवार व उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठनेते पंजाबरावदादा देशमुख,रावसाहेब पाटील, माजी जि.प.सदस्य श्रीकृष्णभाऊ धोटे,केशवभाऊ कापले यांनी उपोषण मंडपाला भेट दिली व त्यांच्या मागण्यांबददल सविस्तर चर्चा केली,बोरी अडगाव येथील शेतकरी यांचे आमरण उपोषण ६ व्या दिवशी सानंदांच्या मध्यस्थीने कृषीमंत्र्यांशी फोन केल्यानंतर मागे घेण्यात आले. लवकरच ज्या रास्त मागण्या आहेत त्याचा विचार केला जाईल अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांनी दिली. उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना नारळ पाणी देवुन उपोषणाची सांगता झाली. यावेळी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सदैव शेतकरी बांधवांच्या हितासाठी कटीबध्द आहे व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार,कृषीमंत्री दत्तामामा भरणे,बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंदआबा पाटील यांचा भक्कम पाठींबा असल्यामुळे खामगाव विधानसभा मतदार संघातील समस्यांचे निराकरण होईल व मोठया प्रमाणात निधी विकास कामासाठी मिळेल असे सांगितले.

आपण उपोषण करुन शेतकरी बांधवांच्या भावना शासनाच्या निर्दशनास आणुन दिल्याबददल उपोषण कर्त्यांचे आभार मानले. याप्रसंगी एकनाथ पाटील,भरतराव पाटील,शेख नन्नु,गजानन नाईक,वासुदेव बोडके,धर्माजी शिरवळ, गजानन खरात,सुरेश सुरवाडे,रमेश सुरवाडे,गजानन खरात,प्रथम गिरी,शेख उस्मान,सचिन बहुरुपी यांच्यासह बोरी अडगाव येथील गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# भरधाव कंटेनरची दुचाकीला धडक; माय-लेकाचा मृत्यू

## स्थानिकांनी पाठलाग करून चालकाला पकडले !

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**बुलढाणा :** आईला उपचारासाठी बुलढाण्यात घेऊन येणाऱ्या मुलाच्या दुचाकीला चुकीच्या दिशेने आलेल्या भरधाव कंटेनर ने जोरदार धडक दिली. या अपघातात माय-लेकाचा मृत्यू झाला. बुलढाणा-धाड मार्गावरील सागवन बसस्थानकाजवळ १८ सप्टेंबर रोजी दुपारी बाराच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातानंतर पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कंटेनर चालकाला काही युवकांनी पाठलाग करून पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले.<जालना जिल्ह्यातील कोल्हापूर येथील अंकुश रामदास जाधव (३२) हे आई लाख उपचारासाठी दुचाकीने बुलढाण्या कडे घेऊन येत होते. त्याचवेळी बुलढाण्या कडून धाड कडे जाणाऱ्या एमएच-२०-जीझेड ७६५८ क्रमांकाच्या कंटेनरने त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली.

धडकेनंतर अंकुश आणि आनंदीबाई हे दोघेही रस्त्यावर फेकले गेले. नागरिकांनी दोघांनाही तातडीने बुलढाणा जिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल

कंटेनर चालकाने वाहन निष्काळजीने चालवत चुकीच्या बाजूने आणल्यामुळे अपघात झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अनिल तुकाराम पवार (रा. अंभोडा, ता. बुलढाणा) यांच्या तक्रारीवरून बुलढाणा शहर पोलिसांनी चालकाविरुद्ध निष्काळजीने वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला. आरोपी चालकाचे नाव मोहम्मद तौफिक खान वसीउल्लाह खान (३०, रा. सिपाह इब्राहिमाबाद, जि. मऊ, उत्तर प्रदेश) असे आहे. पुढील तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहेत.

### नशेचा संशय; वैद्यकीय अहवाल निर्णायक !

चालकाला सरळ उभे राहणेही कठीण होत असल्याने तो मद्याच्या नशेत असल्याचा संशय प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केला; मात्र नशेत वाहन चालविल्याचे अधिकृतरीत्या स्पष्ट होण्यासाठी वैद्यकीय तपासणीचा अहवाल आवश्यक आहे.

# भाजपा युवा मोर्चा संग्रामपूर तालुका अध्यक्ष पदी पुन्हा गोपाल बंड



प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**संग्रामपूर :** संग्रामपूर तालुक्यातील चोंडी येथील रहिवासी गोपाल बंड यांची संग्रामपूर तालुका भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष पदी पुन्हा फेर निवड करण्यात आली. गोपाल बंड मागील बऱ्याच वर्ष पासून भाजपा पार्टी मध्ये सक्रियतेने काम करत आहेत. मागील विधानसभा, लोकसभा, जी प , प. स, तालुक्यातील ग्रामपंचायत, सहकार शेत्रातील निवडणुका मध्ये त्यांनी आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडले. त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून त्यांची तालुका अध्यक्ष पदी फेरनिवड करण्यात आली आहे. वरवट बकाल येथील सहकार विद्या मंदिर मध्ये आयोजित मतदार संघाच्या कार्य शाळेत त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या वेळी भाजप प्रदेश सरचिटणीस व आमदार डा संजय कुटे, जील्ह्याध्यक्ष संचीन बापू देशमुख, तालुका अध्यक्ष भाऊराव अवचार, विविध आघाडी अध्यक्ष, भाजप पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# ध्वनी प्रदूषण करणाऱ्या डीजे चालकाविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**मलकापूर:** शहरातील सार्वजनिक उत्सव, मिरवणुका व इतर सांस्कृतीक तसेच धार्मिक कार्यक्रमांमध्ये ऊछ्ठ चा वापर करुन ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे चालकांविरुद्ध तसेच डिजे वाजविणा-या मंडळाचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेच यापुर्वी सुध्दा मा. सर्वोच्च न्यायालयाचे तसेच हत्रज्ञ कोर्ट पुर्ण यांचे आदेशाने कार्यवाही करण्यात आलेल्या आहेत.

दि. १८ सप्टेंबर २६ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या निर्देशानुसार पोलीस स्टेशन मलकापूर शहरात तसेच पोस्टे हददीत डीजेच्या कर्कश व मर्यादेपेक्षा अधिक आवाजामुळे ध्वनी प्रदूषण केल्या प्रकरणी डिजे मालक आशिष रविंद्र अडकमोल,रा. सरस्वती नगर,भुसावळ, जि. जळगाव यांनी त्यांच्या ताब्यातील रू॥-४३-्रष्ठ-०२०५ या वाहनावरील रू्रष्ठङ्घ स्शह्वठ्ठस्र डीजेचा वापर करून दोन वेगवेगळ्या मिरवणुकांमध्ये निवासी क्षेत्रात मोठ्या व कर्कश आवाजात ध्वनीप्रदूषण केल्याचे निदर्शनास आले. तसा यापुर्वी पो.स्टे मलकापुर शहर येथुन पोलीस अधीक्षक बुलढाणा यांना नमुद डिजे मालका विरुध्द अहवाल सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक बुलढाणा यांचेकडील आदेश प्राप्त झाल्याने नमुद डि.जे मालक आरोपी आशिष रविंद्र अडकमोल, रा. सरस्वती नगर, भुसावळ, जि. जळगाव यांचे विरुध्द दि. १८ सप्टेंबर २६ रोजी पोलीस स्टेशन मलकापुर शहर येथे अपराध क्रमांक ६९४/२०२६ कलम १३६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० लागू कायदेशीर तरतुदीं नुसार कारवाई करण्यात आली आहे.

» तरी पोलीस स्टेशन मलकापूर शहर यांचेकडून समस्त शहर वासीयांना आवाहन करण्यात येते की, सण उत्सव शांततेत व पारंपारीक वाद्य वाजवुन साजरे करावे. मिरवणुकांच्या काळात डीजे ध्वनिक्षेपकाचा वापर करताना शासनाने निर्धारित केलेल्या ध्वनी मर्यादा तसेच वेळेच्या अटी व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे चालक, मालकांवर तसेच (डिजे) धारकास कार्यक्रमात आमंत्रित करणारे संबंधितांवर आगामी काळात सुरु असलेल्या उत्सवा दरम्यान गैरकृत्य करणा-या विरुध्द भविष्यात प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

**गणेश गिरी**
पो. नि पो.स्टे. मलकापूर (शहर)

# गो. से. महाविद्यालयात 24 सप्टेंबरला रक्तदान शिबिर

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**खामगाव :** विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगावद्वारा संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव यांच्या वतीने खामगाव शहराचे शिल्पकार, माजी नगराध्यक्ष, माजी खासदार, विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगावचे माजी अध्यक्ष तथा 'खामगाव रत्न' स्व. ड. शंकररावजी उपाख्य भाऊसाहेब बोबडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शनिवार, १९ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जयंती उत्सव सप्ताह चे आयोजन करण्यात आले आहे. जयंती उत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ सप्टेंबर गुरुवार रोजी जयंती उत्सवाच्या अंतिम दिवशी सकाळी ९.०० ते ११.०० वाजता भौतिकशास्त्र विभागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी मा. श्री. अशोकभाऊ सोनोने (सदस्य विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव), व मा. श्री. राजेंद्रजी झांबड (सदस्य विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव), प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या रक्तदान शिबिरामध्ये शासकीय रुग्णालय, खामगाव यांचे वैद्यकीय पथक उपस्थित राहून रक्तसंकलन करणार आहे. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणी करून नियमानुसार रक्तसंकलन करण्यात येणार आहे.

या भव्य रक्तदान शिबिरामध्ये खामगाव शहर व परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे रक्तदान करून या समाजोपयोगी उपक्रमात आपले योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. रक्तदानामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होते. समाजाप्रती आपली जबाबदारी जपत नागरिकांनी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि “रक्तदान हेच श्रेष्ठदान” या भावनेतून शिबिर यशस्वी करावे, असे आवाहन NSS व NCC विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनुसूचित जाती, जमातीचा मंजूर निधी इतरत्र वळवू नका

## रिपाइं आठवले गटाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**बुलढाणाः** अनुसूचित जाती व जमातींच्या विकासासाठी मंजूर निधी इतर योजनांकडे वळवणे तत्काळ बंद करावे आणि जिल्ह्यात निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीचा विचार करता बुलढाणा जिल्ह्याला दुष्काळग्रस्त जाहीर करावे, या प्रमुख मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने गुरुवार १७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली.

निवेदनात म्हटले की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जातात. या निधीतून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, वसतिगृहे, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र, हा निधी इतर विभागांकडे वळवण्यात येत असल्यामुळे संबंधित समाजाच्या विकासाला मोठा फटका बसत आहे. हा वळवलेला निधी तत्काळ पूर्ववत करून मूळ विभागाला उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच बुलढाणा जिल्ह्यात पावसाची अनिश्चितता आणि पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडले आहेत. पिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना पीकविमा, नुकसानभरपाई आणि दुष्काळी सवलती तातडीने मंजूर करुन जिल्ह्याचा समावेश तत्काळ दुष्काळग्रस्त यादीत करावा. बाधित शेतकऱ्यांना पीकविमा व शासकीय सवलती तात्काळ द्याव्यात. शासनाने या दोन्ही संवेदनशील प्रश्नांवर गांभीर्याने विचार न केल्यास, लोकशाही व संवैधानिक मार्गाने जिल्ह्यात व्यापक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा रिपाइंच्यावतीने देण्यात आला. निवेदनावर विजय सावळे, सुनील आराख, राहुल गवई, अमोल गवई आणि दीपक झिने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गणेशोत्सव मंडळातच मिळणार आरोग्यसेवेची माहिती

## महसूल योजनांचाही जागर

प्रतिनिधी १९ सप्टेंबर

**बुलढाणाः** गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात नागरिकांशी थेट संवाद साधत शासनाच्या योजना, उपक्रम आणि निर्णयांची माहिती पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने 'लोकसंवाद २०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत चिखली येथील निलकमल गणेशोत्सव मंडळात आरोग्य तपासणी, आरोग्यविषयक व निर्णयांची माहिती समुपदेशनासह महसूल नागरिकांना देण्यात विभागाच्या विविध योजना येणार आहे. शनिवार १९ सप्टेंबर रोजी नरेंद्र मोदी लोकसंवाद-२०२६- जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा येथे हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती, नागरिकांची आरोग्य तपासणी आणि आवश्यक आरोग्यविषयक समुपदेशन करण्यात येणार आहे. तसेच महसूल विभागाशी संबंधित शासन आदेश, निर्णय व विविध योजनांची माहितीही नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

### आज 'लोकसंवाद - २०२६' उपक्रम

» गणेशोत्सव हा नागरिकांच्या मोठ्या सहभागाचा उत्सव असल्याने या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. 'लोकसंवाद-२०२६ 'च्या माध्यमातून माहितीपासून लाभापर्यंतचा दुवा अधिक प्रभावी करण्याचा जिल्हा माहिती कार्यालयाचा प्रयत्न आहे. नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आरोग्य तपासणी व शासकीय योजनांची माहिती घेण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोडशेडिंगमुळे गणेशोत्सवावर अंधार

प्रतिनिधी १९ सप्टेंबर




**जामोदः** संवेदनशील गाव म्हणून ओळख असलेल्या जामोद येथे महावितरणकडून 'इमर्जन्सी लोडशेडिंग'च्या नावाखाली वारंवार तासनतास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवावर अंधाराचे सावट निर्माण झाले आहे.

जामोद येथे १४ सप्टेंबर रोजी घरोघरी तसेच गावांत सुमारे १० ते १२ सार्वजनिक गणेश मंडळांकडून लाडक्या गणरायाची उत्साहात स्थापना करण्यात आली आहे. मात्र, ऐन गणेशोत्सवाच्या काळातच सायंकाळच्या आणि रात्रीच्या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने गणेश मंडळांच्या उत्साहावर परिणाम होत आहे. रस्त्यांवर अंधार पसरत असल्याने गणेशभक्तांना दगडांच्या ठोकरा खात चिखल डबक्यातून तसेच अंधारातून गणेश दर्शनासाठी जावे लागत आहे. त्यातच जामोद गावातील काही वीज वितरण रोहित्रांवर क्षमतेपेक्षा अधिक भार असल्याने वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

वारंवार होणाऱ्या या वीजखंडितमुळे घरगुती ग्राहक, दुकानदार तसेच गणेश मंडळांचे कार्यकर्ते त्रस्त झाले आहेत. अंधाराचा फायदा घेऊन एखादा अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता, 'वरूनच इमर्जन्सी लोडशेडिंग आहे, आम्ही काही करू शकत नाही,' असे उत्तर मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गावातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे, ओव्हरलोड रोहित्रांचा प्रश्न मार्गी लावावा आणि ऐन उत्सवाच्या काळात वारंवार खंडीत होणारा विजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी गणेशभक्तांसह ग्रामस्थांकडून होत आहे.

# 'हनुमान सागर' चे दोन दरवाजे 20 सेंमीने उघडले!

## वान नदीपात्रात १,२९४ क्युसेक पाण्याचा विसर्ग

प्रतिनिधी १९ सप्टेंबर



**संग्रामपूर:** वारी भैरवगड येथील हनुमान सागर धरणात पाण्याची आवक वाढल्याने शुक्रवारी दुपारी ३.३० वाजता धरणाचे दोन दरवाजे प्रत्येकी २० सेंमीने उघडण्यात आले. धरणातून वान नदीपात्रात ३६.६४ घनमीटर प्रतिसेकंद (१,२९४ क्युसेक) पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणातील जलसाठा ९९.७६ टक्क्यांवर पोहोचल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला.

सातपुडा पर्वतरांगांतून वाहत सध्या येणाऱ्या वान नदीवर अमरावती, अकोला आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर हे धरण आहे. धरणाची जलाशय पातळी समुद्रसपाटीपासून ४११.९५ मीटर आहे.

धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या विसर्गाचे प्रमाण कमी-जास्त करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गतवर्षी १८ सप्टेंबर रोजी धरणात ८७.१७ टक्के जलसाठा होता. यंदा त्याच कालावधीत जलसाठा ९९.७६ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणातून विसर्ग सुरू झाल्याने वान नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली.

### आवके नुसार विसर्गात बदल!

धरणात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात वाढ किंवा घट झाल्यास दरवाजे उघडण्याचे प्रमाण आणि नदीपात्रातील विसर्ग त्यानुसार बदलण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे.

### धरणाच्या सुरक्षिततेला प्राधान्य!

हनुमान सागर धरणातील पाणीसाठा क्षमतेच्या जवळ पोहोचल्याने धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिरिक्त पाण्याचा विसर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. धरणाच्या दरवाजांद्वारे नियंत्रित पद्धतीने पाणी सोडले जात असून, जलाशयाची स्थिती आणि धरणाच्या सुरक्षिततेशी संबंधित बाबींवर संबंधित यंत्रणांकडून लक्ष ठेवले जात आहे.

### सातपुडा पर्वतरांगांतील पाण्याची आवक!

सातपुडा पर्वतरांगांमध्ये झालेल्या पावसामुळे वान नदीच्या प्रवाहात वाढ झाली असून, त्यातून हनुमान सागर धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135